**ठळक बातम्या**

- क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न देण्याची शिफारस करण्याचा ठराव विधिमंडळात एकमतानं मंजूर
- कायदा सुव्यवस्थेसह विविध प्रश्नांवर सरकार अपयशी ठरल्याची विरोधकांची विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावाच्या माध्यमातून टीका
- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दलच्या टिप्पणीप्रकरणी कुणाल कामराविरोधात एफआयआर दाखल/ तोडफोड प्रकरणी ११ जणांना अटक

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे १ हजार ७९ अंकांची वाढ

**<><><><><>**

क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न देण्याची शिफारस केंद्रशासनाकडे करण्याचा ठराव आज महाराष्ट्र विधानसभेत एकमतानं मंजूर झाला. राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी हा ठराव मांडला होता.

विधानपरिषदेतही हा ठराव एकमतानं मंजूर झाला.

**<><><><><>**

विधानसभेत आज विरोधी पक्षांनी अंतिम आठवडा प्रस्तावाच्या माध्यमातून राज्यातल्या कायदा सुव्यवस्थेसह विविध प्रश्नांवर सरकार अपयशी ठरल्याची टीका केली.

जमीनग्रहण झाले नसताना, इतर विभागांच्या परवानग्या आलेल्या नसतानाही बेकायदेशीररीत्या अनेक नवीन मार्गांच्या कामाचे कार्यादेश घाईनं देण्यामागे नेमके कोणाचे आदेश होते, कोणाला रस होता असा सवाल जयंत पाटील यांनी यावेळी केला. ठाणे घोडबंदर किनारा मार्ग, मुंबईतला वर्सोवा भाईंदर किनारा मार्ग, यात हे प्रकार घडले असून निविदा रकमेपेक्षा जास्त दरानं ही कामं दिली असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

शिवाजी महाराजांबद्दल अनुद्गार काढणारे सोलापूरकर, कोरटकर बाहेर मोकाट कसे फिरतात, त्यांना संरक्षण का दिलं जातं, वांद्रे पूर्व इथल्या शासकीय वसाहतीला झोपडपट्टी पुनवर्सन योजनेत परवानगी कशी मिळाली, अनुदान देण्यासाठी शाळांना मंजुरी देण्याचे अधिकारी नसणारे त्या नामंजूर कशा करतात असे अनेक सवाल उपस्थित करत, सरकारनं याची उत्तरं द्यावीत अशी मागणी जयंत पाटील यांनी केली.

परभणी येथील सूर्यवंशी यांच्या मृत्यूबद्दलचं प्रश्नचिन्ह कायम आहे, बीडमधल्या देशमुख हत्येचे आरोपी अद्याप मोकाट फिरत आहेत, बदलापूर इथल्या घटनेचा आरोपी अक्षय शिंदे यांच्या एन्काऊंटरबद्दलच्या प्रश्नांची उत्तरं कधी मिळतील, असे अनेक प्रश्न जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केले.

नागपूर दंगलीत पोलिसांनी बघ्याची भूमिका बजावली आहे, प्रतिकात्मक कबर जाळण्यात आली त्यावेळी त्यावरची चादर ताब्यात घेतली असती तर हा प्रकार घडलाच नसता, त्यामुळे सरकारच याला जबाबदार आहे, असा आरोप नाना पटोले यांनी केला. आमदारांना दिलेले वाय दर्जाचं संरक्षण खासगी व्यक्तीना कसं दिलं. त्याचा खुलासा सरकारनं करावा अशी मागणी यावेळी केली.

**<><><><><>**

कुणाल कामरा विरोधात कठोरात कठोर कारवाई करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिलं. संविधानाने प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलं असलं तरी यातून दुसऱ्याला अपमानित करण्याचा अधिकार कोणालाही नाही. अशा गोष्टी सहन करणार नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. …

**होल्ड- बाईट - देवेंद्र फडनवीस**

शिवसेना आमदार अर्जुन खोतकर यांनी हा मुद्दा उपस्थित केला आणि कुणाल कामरा याच्या अटकेची मागणी केली. त्याने राज्यातले वातावरण दूषित केले आणि यामुळे राज्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असं खोतकर म्हणाले. त्याला मिळणारा निधी, त्याचे सूत्रधार शोधा, त्याचे कॉल रेकॉर्ड तपासा, अशी मागणी त्यांनी केली.

मंत्री शंभूराज देसाई यांनी खोतकर यांच्या मागणीला सहमती दर्शवली. यानंतर सत्ताधारी सदस्यांनी अध्यक्ष समोरच्या जागेत येऊन घोषणाबाजी केली. त्यामुळे अध्यक्षांनी सभागृहाचे कामकाज ५ मिनिट साठी तहकूब केलं. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी निवेदन केलं.

कुणाल कामरा यानं जनभावना व्यक्त केली असल्याचं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

**होल्ड - उद्धव ठाकरे (२४ सेकंद)**

**<><><><><>**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल कथितरीत्या अपमानजनक टिप्पणी केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा

याच्याविरोधात एफआयआर दाखल केला आहे. तसंच या कार्यक्रमाचं चित्रीकरण ज्या स्टुडिओत झालं, त्या स्टुडिओची आणि हा स्टुडिओ असलेल्या हॉटेलची तोडफोड करणाऱ्या ४० शिवसेना कार्यकर्त्यांविरुद्धही पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली आहे. शिवसेना कार्यकर्ता राहुल कनाल सह ११ जणांना पोलिसांनी तोडफोड प्रकरणी अटक केली आहे.

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजारात गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेली तेजी या आठवड्याच्या पहिल्या दिवशीही कायम राहिली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज १ हजार ७९ अंकांची तेजी नोंदवून ७७ हजार ९८४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३०८ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ६५८ अंकांवर स्थिरावला.

सत्रादरम्यान सेन्सेक्सनं ७८ हजारांची आणि निफ्टीनं २३ हजार ७०० ची पातळी ओलांडली होती. बँकांच्या समभागांमध्ये आज जोरदार वाढ दिसून आली. गेल्याच आठवड्यात या दोन्ही निर्देशाकांनी ४ वर्षातली आठवडाभरातली सर्वोत्तम तेजी नोंदवली होती. रुपयाची मजबुती परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी शुक्रवारी सुमारे साडे ७ हजार कोटी रुपयांची खरेदी केली.

**<><><><><>**

विधानसभा उपाध्यक्ष पदाची निवडणूक २६ मार्च रोजी होणार असल्याची घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज विधानसभेत केली. यासाठी उद्या दुपारी १२ वाजेपर्यंत विधानसभा सचिवांकडे अर्ज जमा करता

येतील, असं त्यांनी सांगितलं. २६ मार्चला सकाळी ११ वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

**<><><><><>**

कोयना प्रकल्पाचा अंतर्भाव कृष्णा खोरे विकास महामंडळात करण्याबाबतची तरतूद असणारं महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ सुधारणा विधेयक आज विधानपरिषदेत मंजूर करण्यात आलं. कोयना प्रकल्पाला निधी उपलब्ध करून देण्याची तरतूद या विधेयकात आहे. या सुधारणांमुळे कोयना प्रकल्पातून होणाऱ्या सिंचन आणि विजनिर्मितीचं व्यवस्थापन कृष्णा खोरे महामंडळाकडे येणार आहे.

महामार्गांचं संरेखन झाल्यानंतर भूसंपादनासाठीच्या एका वर्षाचा कालावधी वाढवून दोन वर्षांचा करण्यासाठीचं महाराष्ट्र महामार्ग सुधारणा विधेयक, तसंच महाराष्ट्र मुद्रांक सुधारणा विधेयक देखील सभागृहानं मंजूर केलं. ऑनलाइन शुल्क भरून आता ई - मुद्रांक प्रमाणपत्र घरबसल्या मिळवता येईल असं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे विधेयक मांडताना सांगितलं .

**<><><><><>**

मुंबईत जुन्या झालेल्या पागडी इमारतींमध्ये राहणाऱ्या संरक्षित भाडेकरूंचा हक्क अबाधित राखून या इमारतींचा पुनर्विकास केला जाईल, कुणालाही बेघर होऊ देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानपरिषदेत दिली.

सरकार मालकांचं नुकसान होऊ देणार नाही, मात्र मालकांनी देखील या इमारतींच्या पुनर्विकासाला सहकार्य करावं, अन्यथा विशेष कायदा करून भाडेकरूंना संरक्षण दिलं जाईल, असं शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अधिवेशनाचे शेवटचे दोन दिवस उरले असल्याने, संख्याबळ न पाहता विधानसभेत विरोधी पक्षनेत्याची नेमणूक करावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

**<><><><><>**

औरंगजेब कबरीचा मुद्दा काढण्याची गरज नाही. तसंच कोणीही बोलतांना विचार करून बोलले पाहिजे, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. विनाकारण पोलिसांवर किंवा कायदा- सुव्यवस्थेवर ताण येईल असं कोणीही बोलू नये, असं त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील पत्रकार परिषदेत सांगितलं.

**<><><><><>**

नागपूर हिंसाचार प्रकरणातला प्रमुख आरोपी फहीम खान याचं दुमजली घर पाडण्यात आलं आहे. काही दिवसांपूर्वी नागपूर महानगरपालिकेने खान याच्या घराचा इमारत आराखडा मंजूर नसल्यामुळे त्याचं घर अनधिकृत असल्याच्या कारणामुळे नोटीस बजावली होती.

**<><><><><>**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त जळगाव इथं आज विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात कोकणात काही ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान सोलापूर इथं  ४० पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस, तर राज्यात सर्वात कमी किमान तापमान अहिल्यानगर १६ पूर्णांक ३ दशांश  अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**